# प्रकल्पाचे नाव :-पी. एस. गौळाऊ प्रकल्प, कारंजा (घा.)

## 1. प्रस्तावना

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ व राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत पी. एस. गौळाऊ प्रकल्प सन ऑगस्ट २०२२ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश गौळाऊ जातीची वंशावळ सुधारणा व आनुवंशिक सुधारणा करून या जातीची उत्पादकता वाढविणे हा आहे. स्थानिक देशी जातींचे संवर्धन व शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे.

## 2. प्रकल्पाचे उद्दिष्ट

गौळाऊ जातीची वंशावळ सुधारणा करणे.

गौळाऊ जातीची आनुवंशिक गुणवत्ता वाढविणे.

उच्च उत्पादक व आनुवंशिकदृष्ट्या सक्षम पशुधनाची निर्मिती करणे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे व देशी जातींचे संवर्धन करणे.

## 3. प्रकल्पाचे कार्यक्षेत्र

गौळाऊ जातीचे मूळ क्षेत्र वर्धा जिल्हा असून त्यासोबत नागपूर व अमरावती जिल्ह्यांचा काही भाग या जातीचा पारंपरिक परिसर आहे. या मूळ क्षेत्रातच पी. एस. गौळाऊ प्रकल्पाअंतर्गत नियोजनबद्ध पद्धतीने कृत्रिम रेतन, दूध मोजणी व निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

## 4. प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेली कामे

या प्रकल्पाअंतर्गत संबंधित कार्यक्षेत्रात एकूण **२९** कृत्रिम रेतन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. जानेवारी **२०२६** पर्यंत एकूण **६६३६** कृत्रिम रेतन करण्यात आले आहेत.

तसेच, गौळाऊ गायींची उत्पादकता तपासण्यासाठी आतापर्यंत **१०५२** गौळाऊ गायींची दूध मोजणी (Milk Recording) करण्यात आली आहे.

## 5. नामनिर्देशित कृत्रिम रेतन (Nominated AI)

दूध मोजणीच्या आधारे निवडलेल्या उच्च उत्पादक गायींना एकूण **२६९** नामनिर्देशित कृत्रिम रेतन (Nominated AI) देण्यात आले आहेत. या प्रक्रियेमुळे उत्कृष्ट आनुवंशिक गुणधर्म पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्यास मदत होत आहे.

## 6. HGM वळू निर्मिती

नामनिर्देशित कृत्रिम रेतनांपासून जन्मलेल्या नर वासरांची निवड करून त्यापैकी **३** उच्च आनुवंशिक गुणवत्ता असलेले (HGM – High Genetic Merit) वळू तयार करण्यात आले आहेत. पुढील टप्प्यात हे HGM वळू वीर्यकेंद्राकडे (Semen Station) सुपूर्द करण्यात येणार असून, त्यांच्या वीर्याचा वापर गौळाऊ जातीच्या आनुवंशिक सुधारणेसाठी करण्यात येईल.

## 7. नागपुरी म्हशींसाठी अतिरिक्त उद्दिष्ट

पी. एस. गौळाऊ प्रकल्पांतर्गत नागपुरी म्हशींसाठी अतिरिक्त **५००** कृत्रिम रेतन **७००** दूध नोंदणी (Milk Recording) असे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी जानेवारी २०२६ पर्यंत नागपुरी म्हशींचे **१३९** कृत्रिम रेतन करण्यात आले असून **६१९** म्हशी दूध नोंदणी अंतर्गत घेण्यात आल्या आहेत.

## 8. निष्कर्ष

पी. एस. गौळाऊ प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांमुळे भविष्यात गौळाऊ जातीची आनुवंशिक गुणवत्ता, दूध उत्पादनक्षमता तसेच एकूण आर्थिक मूल्य लक्षणीयरीत्या वाढण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे देशी पशुधन संवर्धनास चालना मिळून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.